**प्रेस नोट** **दिनांक ०९/०३/२०१९**

## विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर

## जागतिक महिला दिनी महिला पोलीस कर्मचा-यांना अल्पोपहार तथा शुभेच्छा देवुन त्यांचा सत्कार केला.

विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणेशहर, येथे सध्या एकुण ३५ महिला पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.एस.पी.कलगुटकर यांचे मार्गदर्शनाखाली सदर महिला पोलीस कर्मचारी या आपले शासकीय कर्तव्य चोखपणे बजावित असतात. सदर महिला पोलीस कर्मचारी या हल्लीच्या धकाधकीच्या जिवनात आपले घरसंसाराचा समतोल राखुन मा.वरिष्ठांनी त्यांना नेमुन दिलेल्या शासकीय कर्तव्यांचे काटकोरपणे पालन करुन कर्तव्य बजावित असल्यामुळे व त्यांनी यापुढेही अशाच चांगल्याप्रकारे कर्तव्य बजाविणेच्या दृष्टीकोनातुन व समाजामध्ये पोलीस दलाची प्रतिमा उंचाविणेच्या दृष्टीने त्यांचा शासकीय कामातील उत्साह वाढविणेसाठी तसेच समाजाप्रती त्यांचे ऋण व्यक्त करणेसाठी विश्रामबाग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कलगुटकर तसेच पोलीस उप निरीक्षक श्री. परगेवार, श्री.म्हस्के यांनी दिनांक-०८/०३/२०१९ रोजीचे **जागतिक महिला दिनाचे** निमित्त साधुन सदर सर्व महिला पोलीस कर्मचा-यांना अल्पोपहार तथा शुभेच्छा देवुन त्यांचा सत्कार केला. सदरवेळी सर्व महिला पोलीस कर्मचा-यांचे चेह-यावरील आनंद ओसंडुन वाहतांना स्पष्ट दिसत होता.

(एस.पी.कलगुटकर )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.